# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टावर्स,
नरिमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

M. J. P.
MUMBAI-21.
17 AUG 2000
RECEIVED

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एस.टी.डी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

**परिपत्रक क्रमांक** ४९.

जावक क्र.मजीप्रा/सस/तांशा.१/३५०/3531 दिनांक १६/८/२०००

विषय :- पी.व्ही.सी.पाईप्स टाकतांना घ्यावयाची खबरदारी.

ग्रामीण पाणी पुरवठा योजनेकरीता दाबनलिका, गुरुत्वनलिका व वितरणनलिकांसाठी पी.व्ही.सी.पाईपांचा मोठ्या प्रमाणांवर वापर करण्यांत येतो. या संदर्भात असे निदर्शनांस आणून देण्यांत आले आहे की, ज्या रस्त्यांवरुन अवजड वाहनांची वाहतूक चालते अशा रस्त्यांलगत/ रस्त्यांच्या बाजूने टाकलेल्या पी.व्ही.सी.पाईप्स फुटल्याचे प्रमाण जास्त आहे. रस्त्याच्या बाजूने टाकलेल्या पी.व्ही.सी.पाईप्स जरी पुरेशा खोलीवर टाकल्या तरी, रस्त्यांवरील अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे सदर पी.व्ही.सी.पाईपांना इजा पोहचून ते फुटतात व परिणामी पाणी पुरवठा खंडित होणे , दुरुस्तीचा खर्च वाढणे व त्यामुळे लोकांच्या मोठ्या प्रमाणांवर तक्रारी येणे अशा अडचणींना सामोरे जावे लागते. म्हणून याबाबतीत खालील प्रमाणे सूचना देण्यांत येत आहेत, त्यांची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी.

ज्या रस्त्यांवरुन अवजड वाहनांची वाहतुक चालते अशा रस्त्याच्या बाजूने जलवाहिनीसाठी पी.व्ही.सी.नलिका टाकू नयेत. अशा ठिकाणी सी.आय.किंवा डी.आय.पाईप्सचा वापर करावा. तसेच नाला क्रॉसिंगसाठी सुध्दा पी.व्ही.सी.पाईप्स वापरु नयेत. सदर सूचना सर्व मुख्य अभियंत्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रांतील अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांच्या निदर्शनांस आणून दयाव्यात.

( राजेंद्र सगणे )
सदस्य सचिव (तांत्रिक)

प्रत,
सदस्य सचिव, (प्रशासन) म.जी.प्रा. मुंबई
सर्व मुख्य अभियंता, म.जी.प्रा.
सर्व अधीक्षक अभियंता,म.जी.प्रा.मंडळ
सर्व कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.बांधकाम विभाग